आम्ही जबलपूर सोडून दरभंग्याला जायच नक्की झाले जबलपूरच्या (कायमच्या) नोकरीचे जे कांही सोपस्कार होते ते पार पाडले. आम्ही वाराणसीला जाऊन मीटर गेजने दरभंग्याल जावे लागणार होते. मला दिवस होते म्हणून माझ्या मैत्रीणीला बरोबर घेतले. तिचा वर्षाचा मुलगा पण बरोबर होताच. वाराणसीला गाडींत बसलो मी रात्रीच्या वेळी जागले व आतां तुम्ही लक्ष ठेवा सामानावर असें ह्यांना सांगून मी झोपले. उठल्यावर बघतें तो काय हे झोपलेले मैत्रीण पण झोपली होती. सर्व सामान ठीक आहे ना हे पहिले तो काय? मुलांची पादत्राणें नाहीशी झालेली फराळाचा डबा-- शेजारघरी लग्न झाले म्हणून त्यांनी टिफिनच्या डब्यातच लाडू शेव चिवडा वगैरे दिलें होतें ते गेलं. आम्ही लग्नाला हजर नव्हतो म्हणून डबा. मी म्हटले चला सुरवात तर चोरीनें झाली आतां दरभंग्याला पोचेपर्यंत काय होते ते बघूया. मधल्या एका स्टेशनवर चहा घ्यायसाठी मी व मैत्रीण खाली उतरले. हे पाणी आणायला गेले नी गाडी सुरु झाली. छायाने (दोन नंबरच्या मुलीने) भोकाडच पसरले दादा खालीच राहिले म्हणून. मी तिची समजूत घातली अग ते कुठल्यातरी डब्यांत शिरले असतील तेव्हां ती रडायची थांबली. इतर पॅसेंजर कौतुक करत होते की वडीलांवर किती माया पोरीची. दुस-या स्टेशनवर गाडी थांबली व हे आमच्या डब्यांत आले तेव्हां तिचा आनंद अवर्णनीयच होता. दरभंग्याला तेव्हां मीटर गेज होता आतां ब्रॉडगेज झाला आहे. ह्यांचा एक विद्याथी स्टेशनवर हजर होता. सायकलरिक्षा म्हणून मुले नाखूष. पण इलाज नव्हता दोन रिक्षा करुन घरी पोचलो आणि बिहारचे रहिवासी झालो. बिहारमध्यें तब्बल 16 वर्षे राहिलो. मुलांचे शिक्षण उत्तम रीतिने पार पडले. मोठी मुलगी लीना बीएस्सी झाली व एमएस्सी फिजिक्स साठी पाटण्याला बोर्डिग मध्यें गेली. तिथेच राहून आयएएस चे क्लासेस करुन आयएएस झाली व भारतीय प्रशासन सेवेत रुजूं झाली. दुसरी मुलगी होस्टेल मध्यें राहून एमबीबीएस डॉक्टर झाली व मुलगा बीएस्सी पर्यत दरभंगा येथेच शिकला. कांही दिवस मुझफ्फपूररच्या होस्टेल मध्यें एमएस्सी साठी राहिला व नंतर मुंबईला जाऊन आयआयटी होस्टेल ला राहून फिजीक्स मध्यें एमएस्सी झाला. तोपण आयएएस झाला 1980 मध्ये. भारतीय प्रशासन सेवेत आहे. बिहारमध्ये राहून सुध्दां मुलांना उच्च शिक्षण घेतां आले. ह्यांनी मुलाला कधी एक चापट ही मारलेली नाही. पण एका दिवशी मात्र ह्यांची पांचही बोट स च्या गालावर उमटली. मुलगा पण पक्का. हूं की चूं केले नाही. मी अवाक् झाले. मारण्याचे कारण काय तर आमचा शिंपी होता मुसलमान. पण ह्यांच्याबद्दल त्याला खूप आदर होता. तो ह्यांना म्हणाला -- काल तुमचा मुलगा त्या सरदारजीच्या मुलाबरोबर माझ्या दुकानांत आला होता. सरदारजीचा मुलगा कांही बोलला तरी त्याच्या कडे कोणी लक्ष देत नसे. तेंव्हा सतिशच वय 5 वर्षाचें असेल तो शिंप्याला म्हणाला -- हमारा कपडा कल नही लाया तो आपको छठी का दूध याद दिलायेंगे. शिंप्याला खूप वाईट वाटले. बिहार मध्ये लहान मुलांना बबुआ म्हणतात. मला ते लोक बहुजी म्हणत.एका सदाचारी प्राध्यापकाच्या (प्रोफेसर) मुलाने हे शब्द वापरावे हे त्याला योग्य वाटलें नाही. सरदारजीच्या मुलाची संगत सोडा. मी तुम्हाला मुलाला मारायला सांगितलें नाही. मला त्याच्या बोलण्याचें खूप वाईट वाटले - म्हणून सांगितलें. एका प्रध्यापकाच्या मुलानें चांगलें बोलावें - चांगले वागावे अशी सामान्य माणसांची सुद्धा इच्छा. त्यानंतर मात्र सतीश मोठ्यांचा आदर करायला शिकला. आम्ही मुलांच्यावर उत्त- संस्कार व्हावे म्हणून जपत होतोच. महाराष्ट्रांतून त्यावेळीं लोकसत्ता घेत होतों. एकदोन दिवस उशीरां वर्तमानपत्र मिळत असे - पण मुलांना मराठी माणसाचे आचार विचार संस्कृति रामायण महाभारत - सगळयाची ओळख व्हावी हया साठीं किर्लोस्कर मासिक, स्त्री मासिक, वसंत, हंस वगैरे दिवाळी अंक मी आवर्जून मागवत असे. त्यामुळेच त्याना चांगले विचार, चांगले आचरण, चांगले विषय हयांची जाण होत चालली होती. मुलानां कुणी ही वाईट म्हणूं नये हीच इच्छा होती. तसं दरभंगा आम्हाला पसंत होतंच. धरणगांवला मुलांच्या सुटीत जाणे- येणं चालूंच ठेवलं होतं. घराची डागडूजी, स्वच्छतां याकडे त्यामुळे लक्ष होतंच. मुंबईला पण माझी मुलें व मी माझ्या बहीणींकडे जात होतों. माझ्या चारही

बहिणी मुबईलाच होत्या. मी व माझा मोठा भाऊ  मात्र  मुबईच्या बाहेर होतों. मुंबईचें  त्यावेळीही  खूपच आकर्षण असे.